| | |
|---|---|
| | नियमित दिवाणी दावा क्र. ५८/२०२१ मधील<br>नि. नं. १६ वरील आदेश<br><br>सुबराव सन्नाप्पा किल्लेदार वि. जोतीबा वैजू किल्लेदार |

प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. नि.क्र. १६ वर दाखल केलेल्या अर्जाद्वारे प्रतिवादी हे त्यांच्याविरुध्द पारित झालेला "विनाकैफियतीचा" आदेश रद्द करुन त्यांना त्यांचे बचावपत्र व सदर मनाई अर्जास दाखल केलेला खुलासा अभिलेखावर घेण्यासाठी त्यांनी विनंती केली आहे. अर्जात अर्जदार प्रतिवादी कथन करतात की, प्रतिवादी हे दि. ०९/०८/२०२१ इ. रोजी न्यायालयात वकीलामार्फत हजर झाले असून उजव्या पायाने फ्रॅक्चर झालेने प्रतिवादी यांनी दाव्यास कैफियत व मनाई अर्जास म्हणणे देणे करीता वकीलामार्फत मुदत अर्ज देवून वेळोवेळी मुदत घेतली आहे. तसेच कोविड-१९ ह्या संसर्गजन्य साथीच्या रोगामुळे वाहतुक सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांना न्यायालयात हजर राहून दाव्यास कैफियत व तुर्तातूर्त मनाई अर्जास खुलासा विहित मुदतीत दाखल करणे शक्य झाले नाही. यास्तव, झालेला विलंब क्षमायापित करुन अर्जदार प्रतिवादी यांनी दाखल केलेली कैफियत व मनाई अर्जास दाखल केलेला खुलासा अभिलेखावर घेण्याची त्यांनी विनंती केली आहे. पुढे, ते कथन करतात की, प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी न मिळाल्यास त्यांची अपरिमित व कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. अर्जासोबत प्रतिवादी क्र. १ यांचे शपथपत्र जोडले आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जाचे तळाशी म्हणणे दाखल करून तीव्र आक्षेप व हरकत नोंदवून अर्ज खर्चासह निरसित करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांच्या वतीने त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री. एन.एन. गावडे यांचा व वादीच्या वतीने त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री. ए.पी. देवाण यांचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. उभय विद्वान विधिज्ञांनी त्यांच्या कथनानुसार युक्तिवाद केला.

४. अर्जातील मजकूराचे काळजीपूर्वक अवलोकन करता, प्रतिवादी हे पायाने फ्रॅक्चर असल्याचे कथन करतात, त्या पुष्ठयर्थ प्रतिवादी यांचे आजारपण दर्शविण्यासाठी वैद्यकिय प्रमाणपत्र दाखल केले आहे. वस्तुतः प्रतिवादी यांना या दाव्यात हजर होण्यासंबंधीची आदेशिका दि. ३१/०३/२०२१ रोजी रितसर बजावली होती. त्यानुसार, प्रतिवादी यांनी सदर आदेशिका त्यांना प्राप्त झाल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत व जास्तीत जास्त ९० दिवसांपर्यंत बचावपत्र दाखल करणे आवश्यक होते. यातील प्रतिवादी हे मुळातच दि. ०९/०८/२०२१ रोजी दाव्यात हजर झाले

आहेत. त्यामुळे, प्रतिवादी यांनी त्यांना कायद्याने दिलेल्या मुदतीत त्यांनी बचावपत्र दाखल न केल्यामुळे त्यांचा तो अधिकार संपुष्टात आला आहे. तथापि, नैसर्गिक न्याय तत्वानुसार, बचावाची संधी ही या तत्वाचा मूल आधार आहे. त्यामुळे अशी संधी नाकारणे सुध्दा न्यायसंगत होणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाचे '<u>संदिप थापर वि. एस.एम.इ. टेक्नॉलॉजीस, एआयआर २०१४ सर्वोच्च न्यायालय ८९७</u>' मधील न्यायनिर्णयात उध्दृत केल्यानुसार बचावपत्र म्हणजेच कैफियत दाखल करण्यास केवळ ३० दिवसांचा अवधी कायदयाने मान्य आहे व त्यापुढील ६० दिवसाचा वाढीव अवधी हा केवळ अपवादात्मक परिस्थितीमध्ये मान्य करता येईल. या वाढीव अवधीचा उद्देश हा एखादया पक्षावर होणारा अन्याय होऊ न देणे हाच आहे. तथापि, सहजपणे अशा प्रकारचा अर्ज व अशा प्रकारची विनंती मान्य करता येणार नाही हा सुध्दा प्रस्थापित विधिसिध्दांत आहे. अर्जदार प्रतिवादींनी बचावपत्र दाखल करण्यासाठी विहित मुदत व वाढीव मुदत संपल्यानंतर सुमारे ३ महिन्यापेक्षा जास्त अवधी घेतलेला आहे. अर्जदार प्रतिवादींनी अर्जात नमूद केलेली कारणे सुध्दा सुस्पष्ट नाहीत. यावरुन अर्जदार प्रतिवादी हे आपल्या अधिकाराबाबत व कर्तव्याबाबत पुरेसे जागृत नसल्याचे व निष्काळजी असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास येत आहे. अर्जदार प्रतिवादींनी केलेल्या विलंबाबाबत व त्यामुळे झालेल्या प्रतिपक्षाच्या नुकसानीबाबत सुध्दा विचार होणे न्यायाचे संतुलन राखण्यासाठी आवश्यक बनते. या सर्व बाबींचा साकल्ल्याने विचार करुन अर्जदार प्रतिवादी यांच्याविरुध्द खर्चाच्या रकमेचा आदेश करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी पात्र आहे. सबब, पुढील आदेश.

## <u>आ दे श</u>

प्रतिवादी यांनी नि.क्र. १६ वरील अर्जासोबत दाखल केलेली कैफियत अभिलेखावर पुढील शर्ती व अटींवर अधीन राहून नोंदविण्यात येत आहे.

प्रतिवादी यांच्याविरुध्द पारीत झालेला विना कैफियतीचा आदेश प्रतिवादी यांनी पुढील पुर्तता केल्यानंतर रद्द ठरेल.

प्रतिवादी यांनी वादींना रक्कम रु. ५००/- इतकी खर्चापोटी दयावी.

प्रतिवादींनी खर्चाच्या रकमेची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न केल्यास सदर आदेशाचा अमल संपुष्टात येईल याची अर्जदार प्रतिवादी यांनी व वादींनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/--
(अमृत चं. बिराजदार)
दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड

दि. १३/१०/२०२१
चंदगड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. P.W.Ghodekar, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 13/10/2021 |
| order signed by the P. O. on | 13/10/2021 |
| order uploaded on | 14/10/2021 |